# उल्हासनगर महानगरपालिका

जा क्र उमपा/कर विभाग/ प्र-4/87/23
दिनांक 12/01/2024

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30C0008223500 and 30C0008223600 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता डॉ संगिता कोहली, वेदांत स्कुल फॉर दि मेन्टली चॅलेन्जड, उल्हासनगर—३ यांनी टोकन नं ४१२०२३०००१२७९० दिनांक २१/७/२०२३ व टोकन नं ४१२०२३०००१९१२९ दिनांक २/११/२०२३ रोजीचे अर्जान्वये सदरील मिळक्तीचा शैक्षणिक वापर होत असल्याने मालमत्ता कर आकारणीत सुट मिळणेबाबत हरकत दाखल केली आहे.

B] अर्जासोबत पुढीलप्रमाणे कादगपत्र सादर करण्यात आली आहेत.

अ)मुंबई सार्वजनिक विश्त्रस्तव्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीचे प्रमाणपत्राची (वेदांत फाउंडेशन——नोंदणी क्रमांक ई—१४०४५ मुंबई) प्रत.

ब)मुंबई विदयापिठ यांचेकडील पत्र क्र. AFF/Recog-I/2693/2010, dt. 17/8/2010 and पत्र क्र. AFF-II/ICD/2013-14/2011,dt.23/10/2013

क)शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएफएस—१०१४/ प्र.क्र १९१/एसएम—२ दिनांक ३० जून २०१४

ड)शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग यांचे कार्यालय मुंबई यांचेकडील दिनांक ३०/८/२०१४ रोजीचे परवानगी पत्र

इ)आयकरात सवलत असल्याचे प्रमाणपत्र

ई)संस्थेचे हिशोबाची कागदपत्रे

उ)महिला व बालकल्याण मंत्रालय यांचेसमवेत करण्यात आलेला करारनामा

C] महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व अधिनियमाचे अनुसूचि ड मधील प्रकरण ८ कराधान नियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या इमारती व जमिनींवर ''मालमत्ता कर'' आकारणी करण्यात येते. तसेच महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ अंतर्गत ''शिक्षण कर व रोजगार हमीकर'' ची आकारणी करण्यात येते. सदर दोन्ही अधिनियमात कर आकारणीत सुट देणे संदर्भात तरतुद पुढीलप्रमाणे आहे.

अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम :— कलम १३२—सामान्य कर कोणत्या जागांवर बसवावयाचा (१) सामान्य कर पुढील इमारती व जमिनींव्यतिरिक्त शहरातील सर्व इमारतींवर व जमिनींवर बसविण्यात येईल— (क) केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या व व्यापारासाठी किंवा फायदा मिळविण्यासाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश नसलेल्या ज्या इमारती व जमीनी निहीत आहेत,

ब) महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२— Rules 7, The following lands and building shall be exempted from payment of the tax on lands and buildings, that is to say:- [e] lands and building or portions thereof belonging to a public trust registered under the Bombay Public Trusts Act, 1950[or a wakf registered under the Wakf Act, 1954] and exclusively occupied for public worship or for charitable purposes

D] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० नोंदविलेली आहे. तसेच संस्था विना अनुदानित तत्वावर [Permanently no grant basis]/स्वंय अर्थ सहाय्यित तत्वावर शैक्षणिक प्रयोजनार्थ कार्य करीत आहे. सदर मिळकतीमध्ये कोणताही वाणिज्य वापर होत नाही. तसेच महिला व बालकल्यांण मंत्रालय यांचेसमवेत दिनांक २१/९/२०१५ रोजी करण्यात आलेला करारनामानुसार सदर संस्था सामाजिक कार्य सुध्दा करीत आहे.

उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30C0008223500 and 30C0008223600 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ अंतर्गत मालमत्ता कर व शासकीय करात वर्ष २०२३—२०२४ करीता अनुज्ञेय सुट देवुन बिल बजावणेसाठी शिफारस करण्यात आली आहे यास्तव पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

## आदेश

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 30C0008223500 and 30C0008223600 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ अंतर्गत मालमत्ता कर व शासकीय करात वर्ष २०२३—२०२४ पासुन अनुज्ञेय सुट देवुन वर्ष २०२३—२०२४ करीता बिल बजावण्यात यावे

उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत
मे कोल्ब्रो ग्रुप